दिवाणी किरकोळ अर्ज नं. २५/२०२६

Exh. 14/B

मे. प्रमुख जिल्हा न्यायाधिशसो, कोल्हापूर

यांचे कोर्टात..........

श्री. प्रसाद बाबासो लबाजे — अर्जदार

विरुध्द

१. श्री. रघुनाथ राघो पाटील वगैरे. — वि.प.

यातील वि.प. नं. ३ ते ६ तर्फे अर्जदार यांचे अर्जास म्हणणे खालीलप्रमाणे :—

Seen & filed
P.DJ, Kop
4-3-26

१. प्रस्तुतचा अर्ज हा कायदेशीर असुन कोर्ट प्रोसिजरचा गैरवापर आहे.

२. सदरचा अर्ज कायदयातील तरतुदीनुसार चालणेस पात्र नाही.

३. अर्ज कलम २ मधील कथित साठेखत दस्ताबाबतचा मजकुर साफ खोटा व चुकीचा आहे. सदरचा दस्त हा बेकायदेशीर बोगस असुन बाळगोंडा आण्णा पाटील यांचेशी संगणमत करून विनामोबदला केलेचा दर्शविला आहे.

४. प्रस्तुत अर्जदार व त्यांचे वडील हा विनापरवाना अवैध खाजगी सावकार आहेत. यांचे विरूध्द खाजगी सावकारीचा गुंन्हा दाखल असुन त्यांना फौजदारी गुन्हयामध्ये शिक्षा देखील झालेली आहे.

अर्जदार व त्यांचे वडील यांच्या अनेक केसेस मा. दिवाणी व फौजदारी न्यायालय कोल्हापुर व कागल येथे प्रलंबित आहेत. त्यांना कोर्ट केसेसचा बरीच वर्षे अनुभव आहे. अर्जदारचे वडील कोर्ट केसेसमध्ये तरबेज आहेत.

५. अर्ज कलम ३ मधील नमुद ता. २५/०४/२०१९ इा रोजीचे कथित संचकारपत्राबाबतचा सर्व मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन तो वि.प. नं. ३ ते ६ यांना मान्य व कबुल नाही. सदरचे कथित संचकारपत्र देखील वि.प. नं. २ व अर्जदार व बाळगोंडा आण्णा पाटील यांना संगणमताने केलेचे दर्शविले आहे.

६. अर्ज कलम ४ मधील मजकुर खरा व बरोबर आहे. वि.प. नं. १ ने वि.प. नं. ३ ते ६ चे पुर्वहक्कदार कै. भिंकाजी कल्लु खोत यांना ता. ३१/०८/२०१८

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

झा रोजी कायदेशीर असे लेखी नोटराईज्ड संचकारपत्र लिहुन दिलेले होते व आहे. त्याबाबतचा स्पे.क.नं. ८०/२०२० हा दावा दाखल असलेचा मजकुर खरा आहे.

७. अर्ज कलम ५ मधील मजकुर साफ खोटा व चुकीचा आहे. सर्व दावे हे चौकशीसाठी प्रलंबित असलेचा मजकुर साफ खोटा व चुकीचा आहे. स्पे.क. नं. ८०/२०२० हा दावा प्रस्तुत वि.प. नं. ३ ते ६ यांनी दाखल केला असुन त्यामध्ये अर्जदार व वि.प. नं. १ हे पक्षकार आहेत. सदर केसमध्ये वि.प. नं. ३ ते ६ यांनी त्यांनी स्वत:ला व साक्षीदार यांना तपासले आहे. तसेच अर्जदार यांनी अर्जदार व साक्षीदार यांना तपासले आहे. सदर केसमध्ये दोन्ही बाजुचा पुरावा संपला असुन प्रस्तुत काम हे अंतिम युक्तीवादावरती आहे. त्यामुळे केवळ स्पे.क. नं. ८०/२०२० या कसेचा निकाल थांबवणेकरीता बेकायदेशीरपणे प्रस्तुत अर्जाची रचना केली आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर होणे आवश्यक आहे.

८. अर्ज कलम ६ मधील सर्व मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन तो यातील वि.प. नं. ३ ते ६ यांना मान्य व कबुल नाही. प्रस्तुत वि.प. नं. ३ ते ६ यांचे संचकारपत्र हे सर्वात अगोदरचे व पहिले आहे. सदर संचकारपत्रामधील साक्षीदार व मध्यस्थ बाळगोंडा आण्णा पाटील हा अर्जदारचे वडील यांचा खाजगी सावकारी व्यवसायातील हस्तक आहेत. सदर बाळगोंडा पाटील याने प्रस्तुत वि.प. नं. ३ ते ६ यांची फसवणुक करणेरकीता संगणमताने सदर कथत करारपत्रे अर्जदार व वि.प. नं. २ चे नांव दर्शविली आहेत.

वि.प. नं. ३ ते ६ चे संचकारपत्र व अर्जदार व वि.प. नं. २ चे कथित संचकारपत्रावर बाळगोंडा आण्णा पाटील हा एकच साक्षीदार आहे. त्यामुळे वि.प. नं. ३ ते ६ चे संचकारपत्राबाबत सर्व माहीती असताना अर्जदार व वि.प. नं. २ यांनी संगनमताने सदर बोगस बनावट व व्हाईड अशा कथित संचकारपत्राचा बनाव केलेला आहे. यावरून ही सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही.

९.. अर्ज कलम ७ व ८ मधील सर्व मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन तो वि.प. नं. ३ ते ६ यांना मान्य व कबुल नाही. स्पे.क.नं. ८०/२०२० हा दावा सर्व प्रथम असुन सदर दाव्यामध्ये अर्जदार हे पक्षकार आहेत असे असताना त्यांनी गेली सहा वर्षे सदर दावे एकत्र करणेबाबत कोणतीच हालचाल केलेली नाही. यावरून अर्जदार यांना त्यांचे स्वत:चे चुकीचा गैरफायदा घेता येणार नाही.

सदर अर्जामधील मागण्या हया एकसारख्या नसुन पुरावा हा वेगवेगळा आहे. त्यामुळे सदर तीन ही दावे एकत्र करणेची कोणतीही आवश्यकता नाही. प्रस्तुत वि.प. नं. ३ ते ६ हे स्पे.क.नं. १९०/२०२० मध्ये व रे.क.

Superintendent(Lit.)
District Court,Kolhapur

नं. ८७/२०२१ मध्ये पक्षकार नाहीत. तथापी केवळ रे.क.नं. ८७/२०२१ मध्ये वि.प. चा त्रयस्त पक्षकार करणेचा अर्ज प्रलंबित आहे.

१०. प्रस्तुत वि.प. यांचा स्पे.क.नं. ८०/२०२० या दाव्यातील पुरावा पुर्ण झाला असुन एकच पुरावा तीन दावेमध्ये करणेचा प्रश्नच येत नाही. तसेच स्वतंत्र निकाल झालेने निरनिराळे मतांतर व गुंतागुंत होणेचा प्रश्नच येत नाही. सदर तीन ही दावे एकत्र करणेची कोणतीच आवश्यकता नाही. अर्जदार हे मे. कोर्टाची दिशाभुल करत आहेत.

११. अर्ज कलम ९ मधील मजकुर साफ खोटा व चुकीचा आहे प्रस्तुत अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही.

१२. <u>सबब वि.प. नं. ३ ते ६ ची विनंती की,</u>

अ. प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

ही विनंती

कोल्हापूर.

ता. ०४/०३/२०२६

स.नि.हा.हा.आं. ...... असे द..

४.

५.

६. यु प्र पाटील

## प्रतिज्ञा

आम्ही वि.प. नं. ३ ते ६ सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, वर नमुद म्हणणे मधील सर्व मजकुर आमचे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा.

कोल्हापूर.

ता. ०४/०३/२०२६

३.

४.

५. [signature]

६. यु प्र पाटील

<u>ॲफिडेव्हीट</u>

मी वि.प. नं. ५ श्री. अनिल भिकाजी खोत व.व. : ४९, धंदा : शेती, रा. रणदिवेवाडी, ता. कागल, जि. कोल्हापूर शपथेवर निवेदन करतो की, वर नमुद म्हणणेमधील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केले ॲफिडेव्हीट. आज मुक्कामी कोल्हापूर.

ता. ०४/०३/२०२६

[signature]

प्रतिज्ञा

मी वि.प. नं. ५ श्री. अनिल भिकाजी खोत व.व. : ४९, धंदा : शेती, रा. रणदिवेवाडी, ता. कागल, जि. कोल्हापूर सत्यप्रतिज्ञेवर निवेदन करतो की, वरील म्हणणे व ॲफिडेव्हीटमधील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणुन केली प्रतिज्ञा.

[signature]

कोल्हापूर.

ता. ०४/०३/२०२६

Solemnly affirmed before me by

Shri./~~Smt~~. Anil Bhikaji Khot

Age 49 Occp. Agri of Randivewadi, Tal. Kagal

who is identified by Shri. H. P. Randive Adv.

..............Adv. whom I Know Personally

Dt. 4 / 3 / 26

[signature]

Superintendent(Lit.)

District Court, Kolhapur